दि विटा मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटा (सांगली)
THE VITA MERCHANTS' CO-OP. BANK LTD., VITA (SANGLI)
प्रधान कार्यालय : यशवंतनगर, साळशिंगे रोड, विटा, ४१५ ३११ (जि. सांगली)
HEAD OFFICE : Yashwantnagar, Salshinge Road, VITA 415 311 Dist. : Sangli
PH. (02347) 273313, 273314, FAX No.: 273317 E-mail : vitabank.bank@gmail.com

# ** सेफ डिपॉझीट लॉकर धोरण 2025-2026 **

## Policy for Safe Deposit Lockers / Safe Custody Articles & Its Standard Operating Procedure 2025-2026

प्रस्तावना ः

सदरचे " सेफ डिपॉझीट लॉकर्स / सेफ कस्टडी आर्टीकल्स बाबतच्या सुचना व निर्देशास अनुसरून आपल्या बँकेचे सेफ डिपॉझीट लॉकर्स / सेफ कस्टडी आर्टीकल्स व त्याच्या स्टँडर्ड कार्यपद्धतीबाबतचे धोरण पुढीलप्रमाणे सदरचे धोरण ठरवतांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा विचार केला आहे. दस्तऐवजात बँकेच्या सर्व शाखांकडील, विविध प्रकारच्या लॉकर्सचे सुयोग्य संचलन व त्यांची कार्यप्रणाली याबाबतची माहिती दिलेली आहे.

**ग्राहक पात्रता व ग्राहक ओळख (Customer Due Diligence) ः**

- लॉकरचे आर्थिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे राहील.
- सेफ डिपॉझीट लॉकर्स ही बँकेने आपल्या सर्व शाखांमध्ये ग्राहकांच्या सुविधेसाठी विस्तारित केलेली एक सहाय्यक सेवा आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमांच्या अधिन राहून केवायसी व योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केलेनंतर सेफ डिपॉझीट लॉकरच्या कॅबिनेटमधील एक लॉकर युनिट बँकेच्या ग्राहकांना भाडेतत्त्वावर दिले जाईल. बँक व ग्राहक यांचेतील संबंध हे मालक ( Lessor ) व भाडेकरू ( Lessee ) या स्वरूपाचे असतील.
- सेफ डिपॉझीट लॉकर भाडयाने घेणेसाठी सदर ग्राहकाचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे.
- Indian Contract Act-1872 ( As amended from time to time ) नुसार करार करण्यास सक्षम व्यक्ती ( Individually / Jointly ),संस्था, पब्लिक लिमिटेड कंपनी, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी, भागीदारी कंपनी, न्यास यांना सेफ डिपॉझीट लॉकर भाडयाने घेता येतील. कायदयाने अज्ञान व्यक्तीच्या नांवे लॉकर भाडयाने घेता येणार नाही. तसेच Indian Contract Act-1872 ( As amended from time to time ) नुसार करार करण्यास अपात्र असलेल्या व्यक्तीस लॉकर भाडयाने घेता येणार नाही.
- ग्राहकांनी बँकेच्या विहीत नमुन्यात लॉकरसाठी अर्ज केल्यानंतर " First Come,First Serve" या तत्त्वावर लॉकर्सची उपलब्धता लक्षात घेऊन लॉकरचे वाटप केले जाईल. लॉकर उपलब्ध नसतील तर ग्राहकाचा लॉकरचा अर्ज प्रतिक्षायादीत समाविष्ट करून प्रतिक्षा यादी कमांकासह अर्जाची पोहोच ग्राहकाला दिली जाईल. ग्राहकाच्या मागणीनुसार लॉकर उपलब्ध झालेनंतर ग्राहकाला तशी लेखी सूचना दिली जाईल.
- केवायसी व इतर आवश्यक बाबींची पूर्तता, लॉकर भाडयाने घेणेपूर्वी ,ग्राहकांनी करणेची आहे.

Scanned with OKEN Scanner

- लॉकर्समध्ये कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर, धोकादायक वस्तू व / किंवा स्फोटक साहित्य ठेवता येणार नाही. तसेच याबाबत लॉकरधारकाने स्वतंत्ररित्या बँकेस Declaration देणे बंधनकारक राहील. जर बँकेला एखादया लॉकरमध्ये ग्राहकाने बेकायदेशीर, धोकादायक वस्तू व / किंवा स्फोटक साहित्य ठेवले असावे असा संशय असेल तर सदर ग्राहकाविरूध्द व लॉकरबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करणेचा बँकेला अधिकार असेल.
- ग्राहकाला लॉकर बँकेकडे परत करणेचा असलेस ग्राहकाने बँकेला किमान चौदा दिवसाची पूर्वसूचना दिली पाहिजे.
- ग्राहकाने बँकेला लॉकर परत करतांना सुस्थितीत देणेचा आहे. मोड तोड झाली असलेस त्याच्या दुरूस्तीचा खर्च लॉकर धारकाकडून वसूल केला जाईल.
- लॉकर बँकेला परत देताना सर्व लॉकर धारकांनी बँकेत समक्ष हजर राहावे लागेल.
- लॉकर साठी नामांकन करता येईल.
- न्यायालयाच्या किंवा सक्षम अधिका-याच्या ( Competant Authority ) आदेशाने ग्राहकाच्या लॉकरवर टांच आदेश लागू करण्याचा बँकेला अधिकार आहे.
- लॉकर धारकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीला लॉकर Operate करणेसाठी अधिकार देता येतील. तथापी असा अधिकार लेखी स्वरूपात दिला पाहिजे व असा अधिकार लॉकर धारकाच्या हयातीच्या कालावधीसाठीच लागू राहील. लॉकर धारक मयत झाल्यास असे अधिकार आपोआप रद्द होतील.
- बँकेला लॉकरधारकाचे व्यवहार संशयास्पद वाटल्यास कोणतेही कारण न देता, लॉकर धारकाला 15 दिवसांची आगाऊ नोटीस देऊन, लॉकर परत मागणेचा अधिकार बँकेला राहील. यासंबंधी ग्राहकाला कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण देणे बँकेवर बंधनकारक नाही.
- रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार सदरच्या धोरणांत बदल करणेचा अधिकार संचालक मंडळाला राहील व ते सर्व लॉकरधारकांवर बंधनकारक राहतील. तथापी सदरचे बदल हे रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी दिलेल्या निर्देशांस पूरक असतील.
- सदरचे धोरण हे Model Policy म्हणून अंमलात राहील. तथापी ज्या धोरणाबाबत संदिग्धता असेल अशा धोरणांबाबत, रिजर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिलेल्या निर्देशानुसार बँक कामकाज करेल.

<u>करारपत्र :</u>

- लॉकर भाडयाने घेणेसाठी ग्राहकाने बँकेशी लॉकरबाबत, प्रचलित भारतीय मुद्रांक कायदा 1899 ( As amended from time to time ) मधील तरतूदीनुसार योग्य त्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर, संचालक मंडळाने मंजूर केलेल्या नमुन्यात, करार करून देणेचा आहे.
- सदरचा करार ग्राहक व बँकेतर्फे शाखाधिकारी किंवा संचालक मंडळाने असा करार करण्यास अधिकार प्रदान केलेली व्यक्ती अशा दोघांच्या सहीने केला जाईल.
- ग्राहकाला त्याचे हक्क व जबाबदारी यांची माहिती व्हावी म्हणून सदरचा करार डुप्लीकेट मध्ये केला जाईल व डुप्लीकेट प्रत ग्राहकाला दिली जाईल. कराराची मूळ प्रत शाखा कार्यालयात ठेवली जाईल.
- सध्या असलेल्या लॉकर ग्राहकांकडून संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सुधारित नमुन्यातील करार 31 डिसेंबर 2023 पूर्वी नव्याने करून घेणेस मुदत वाढ दिली आहे.

THE VITA MERCHANTS' CO-OP. BANK LTD. VITA (SANGLI)

Scanned with OKEN Scanner

- करार जास्तीत जास्त पाच वर्षासाठी केला जाईल. पाच वर्षानंतर कराराचे नव्याने नूतनीकरण करणेचे आहे.

लॉकर भाडयाबाबतचे धोरण :

- लॉकर भाडयाचा दर ठरवणेचा अधिकार संचालक / व्यवस्थापक मंडळाला राहील.
- लॉकर भाडे दरात बदल करणेचा अधिकार संचालक / व्यवस्थापक मंडळाला राहील. असा केलेला बदल जुन्या लॉकर्ससाठीही लागू करता येईल.
- विशिष्ट रकमेचे भाग धारण करणारे सभासद ग्राहक, संस्था ग्राहक व बिगर सभासद ग्राहक यांचेसाठी वेगवेगळया प्रकारचे लॉकरसाठी वेगवेगळे दर ठरवण्याचा अधिकार संचालक / व्यवस्थापक मंडळाला राहील. त्यासाठी किमान किती रकमेचे भाग धारण करावे लागतील त्याची मर्यादा ठरवणेचा अधिकारसंचालक / व्यवस्थापक मंडळाला राहील.
- लॉकर भाडयाचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे राहील.
- लॉकर भाडे आगाऊ भरले पाहिजे.
- लॉकर ज्या तिमाहीत ( जानेवारी ते मार्च, एप्रिल ते जून, जुलै ते सप्टेंबर व ऑक्टोंबर ते डिसेंबर) भाडयाने घेतला असेल त्या तिमाहीसह उर्वरित तिमाहींचे लॉकर भाडे आगाऊ घेतले जाईल. उदा. जर लॉकर माहे जानेवारी ते मार्च या तिमाही मध्ये घेतला तर चारही तिमाहीचे म्हणजेच पूर्ण एक वर्षाचे लॉकर भाडे आगाऊ घेतले जाईल. पण जर लॉकर माहे एप्रिल ते जून या तिमाही मध्ये भाडयाने घेतला तर चालू तिमाही म्हणजेच एप्रिल ते जून या तिमाही सह उर्वरित दोन तिमाहीचे, जुलै ते सप्टेंबर व ऑक्टोंबर ते डिसेंबर, असे तीन तिमाहीचे लॉकर भाडे आगाऊ घेतले जाईल.
- लॉकर भाडे आगाऊ भरले असेल व लॉकरची मुदत संपण्यापूर्वी लॉकर खाते बंद करावयाचे असलेस उर्वरित कालावधीचे आगाऊ भरलेले लॉकर भाडे ग्राहकाला परत केले जाई ल. तथापी ज्या तिमाहीत लॉकर खाते बंद केले असेल त्या तिमाही अखेरचे लॉकर भाडे वसूल करून उर्वरित पूर्ण तिमाहीचे, ग्राहकाने आगाऊ भरलेले, लॉकर भाडे परत केले जाईल.
- ग्राहकाच्या सूचनेनुसार लॉकर भाडयाची रक्कम दरवर्षी खातेदाराच्या खात्यातून परस्पर कपात करून घेतली जाईल.
- लॉकर भाडयाच्या नियमित वसूलीसाठी, वार्षिक लॉकर भाडयाच्या तीन पट रक्कम + लॉकर फोडणेसाठी लागणारा खर्च इतक्या, किमान रकमेची किंवा संचालक / व्यवस्थापक मंडळ निश्चित करेल त्या रकमेची ठेव , ग्राहकाला बँकेकडे लॉकर भाडयाने घेणेपूर्वी ठेवावी लागेल. लॉकर भाडयाने देताना किमान किती रकमेची ठेव बँकेकडे ठेवावी लागेल याचा निर्णय घेण्याचा अधिकार संचालक / व्यवस्थापक मंडळाला राहील.
- लॉकर भाडे In Advance भरणेचे आहे. त्यामुळे जर लॉकर भाडे In Advance भरलेले नसेल तर सदर ग्राहकाला लॉकर Oprate करण्यास प्रतिबंध करण्याचा बँकेला अधिकार राहील.
- ग्राहकाने सलग तीन वर्षे लॉकर भाडे न भरलेस सदरचा लॉकर मोकळा करून मागणेचा बँकेस अधिकार राहील.

Scanned with OKEN Scanner

लॉकर व्यवहाराबाबतचे धोरण :

- ➢ ग्राहकाला बँकेच्या कार्यालयीन वेळेत लॉकर सुविधेचा लाभ घेता येईल. तसेच बँकेच्या कार्यालयीन वेळेत एका दिवशी जास्तीत जास्त दोन वेळा लॉकर सुविधेचा लाभ घेता येईल.
- ➢ लॉकर संबंधीचे व्यवहार करण्यापूर्वी लॉकर धारकाने / अधिकृत व्यक्तीने लॉकर व्हिजीट रजिस्टरमध्ये नोंद करून सही केली पाहिजे.
- ➢ लॉकर संबंधीचे व्यवहार करण्यासाठी लॉकर धारक त्याच्या वतीने एखादया व्यक्तीची ( Mandate Under Power of Attorny ) नेमणूक करू शकेल. अशा अधिकार दिलेल्या व्यक्तीची केवायसी कागदपत्रे व लेखी अधिकार पत्र लॉकर धारकाने बँकेला दिले पाहिजे. सदर व्यक्तीने लॉकर संबंधी केलेले सर्व व्यवहार हे लॉकर धारकाने केलेले आहेत असे मानण्यात येतील व ते सर्व व्यवहार लॉकर धारकावर बंधनकारक राहतील.
- ➢ लॉकर Oprate केलेनंतर, लॉकर व्यवस्थित बंद झाला असल्याची व आपली कोणतीही मौल्यवान वस्तू बाहेर राहीलेली नाही याची खात्री करणेची जबाबदारी लॉकर धारकाची व / किंवा त्यांचे अधिकृत व्यक्तीची, ज्यांनी लॉकर Oprate केला आहे त्यांची, राहील.

स्ट्रॉंग रूम व्हॉल्टची सुरक्षा याबाबतचे धोरण :

- ➢ शाखेतील लॉकर्सची सुरक्षा ही बँकेची जबाबदारी असलेने बँक याबाबत योग्य ती दक्षता घेईल.
- ➢ बँकेच्या लॉकररूम मध्ये अधिकृत व्यक्तीशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही.
- ➢ बँकेच्या लॉकर रूममध्ये जाणा-या व येणा-या व्यक्तींचे स्वतंत्र व्हिजीट बुक शाखांनी ठेवणेचे आहे.
- ➢ कोणाही अनाधिकृत व्यक्तीला लॉकर रूम मध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

Non-Operate लॉकर्सबाबतचे धोरण :

- ➢ ग्राहकाने एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लॉकर Operate न केलेस असे लॉकर Non-Operate Locker समजले जातील. बँक अशा लॉकर धारकांस, लॉकर Oprate करणेबाबत 15 दिवसांची नोटीस देईल. या नोटीसीस लॉकर धारकाने सकारात्मक प्रतिसाद न दिलेस अगर लॉकर Oprate न केलेस लॉकर रिकामा करून ताव्यात घेण्याचा बँकेस अधिकार राहील.
- ➢ लॉकर भाडयाची नियमित वसूली चालू असेल परंतू सात वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लॉकर Operate न केलेस व बँक लॉकर धारकाच्या बँकेकडील उपलब्ध पत्त्यावर / ई मेल आयडी वर लॉकर Oprate करणेबाबत नोटीस पाठवेल. तसेच / किंवा लॉकर धारकाच्या बँकेकडील उपलब्ध मोबाईल नंबरवर लॉकर Operate करणेबाबत SMS पाठवेल. तथापी सदरची नोटीस परत आलेस किंवा लॉकर धारक Untracable असलेस बँक वर्तमानपत्रांतून यासंबंधी जाहिर नोटीस देऊन लॉकरधारकाला कारवाईबाबत माहिती देईल व यासंदर्भात बँकेशी संपर्क साधणेबाबत आवाहन करेल. तथापी तरी सुध्दा लॉकर धारकाने दिलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिलेस बँक सदरचा लॉकर दोन साक्षीदारांचे समक्ष Breaking- open करेल व त्यातील वस्तूंची यादी तयार करून सदर यादीसह वस्तू साक्षीदारांच्या सहीनिशी स्वतंत्र पेटीत Sealed करून ठेवेल व लॉकर धारकांच्या कायदेशीर वारसांचा / नामनिर्देशित व्यक्तीचा शोध घेऊन त्यांचेकडे सदरच्या वस्तू सुपूर्द करणेचा प्रयत्न करेल. परंतू लॉकर Breaking- open ची प्रकिया केलेनंतर एक वर्षाच्या कालावधीत लॉकर धारकांच्या कायदेशीर वारसांचा / नामनिर्देशित व्यक्तीचा ठावठिकाणा न सापडलेस अगर सदरच्या

Scanned with OKEN Scanner

वस्तूबाबत कोणीही मालकीहक्क न सांगीतलेस बँकेस सदरच्या वस्तूंची कायदेशीर मार्गाने विल्हेवाट लावण्याचा अधिकार राहील.

- कांही अपरिहार्य कारणास्तव ग्राहकाला लॉकरचा किमान वापर करता आला नसलेस तसा बँकेकडे रितसर अर्ज ग्राहकाने केल्यास बँकेची खात्री पटली तरच लॉकर पुन्हा वापरणेस बँक परवानगी देईल.

लॉकर Breaking-open करणेबाबतचे धोरण ः

- ग्राहकांकडून लॉकरची किल्ली गहाळ झालेस व लॉकर धारकाने बँकेला तशी लेखी स्वरूपात विनंती केल्यास नविन किल्ली बनवणेसाठी लॉकर धारकाचे किंवा त्याने नेमलेल्या अधिकृत व्यक्तीच्या समक्ष लॉकर Breaking- openकेला जाईल.लॉकर Breaking- open करणेसाठी होणारा सर्व खर्च लॉकर धारकाने In Advance भरणेचा आहे.
- सलग तीन वर्षाच्या कालावधीचेलॉकर भाडे Unpaidराहिलेस व वारंवार सूचना देऊनही लॉकर धारकाने सकारात्मक प्रतिसाद न दिलेस / ग्राहकाने एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी लॉकर Operate न केलेस / लॉकर भाडयाची नियमित वसूली चालू असली परंतू लॉकर सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी Oprate न केलेस ( In case of missing person ), दोन पंचांच्या समक्ष लॉकर Breaking open केला जाईल.व लॉकर धारकाच्या बँकेकडील सुरक्षा ठेवीतून लॉकर चा खर्च वसूल केला जाईल.यासंदर्भात खालीलप्रमाणे पध्दत अवलंबली जाईल.
    - अशा प्रकारे लॉकर Breaking open करणेपूर्वी बँक संबंधीत लॉकर ग्राहकाला त्याच्या बँकेकडील उपलब्ध पत्त्यावर / बँकेकडील त्याच्या नोंदणीकृत मोबाईलवर किंवा / व ई मेल आयडी वर, बँक, लॉकर Break open करणार असलेबाबतची, किमान 15 दिवसांची आगाऊ नोटीस वजा सूचना देईल व लॉकरमधील वस्तू काढून घेणेबाबत सूचना देईल.
    - वरीलप्रमाणे ग्राहकाला पाठवलेली नोटीस Undelivered परत आलेस किंवा सदरचा ग्राहक Untracable असलेस बँक दोन दैनिक वर्तमानपत्रांत सदर कारवाईची जाहीर नोटीस देईल.त्यापैकी एक नोटीस स्थानिक भाषेत व एक इंग्लिश भाषेत दिली जाईल.
    - नोटीस कालावधीत ग्राहकाकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळालेस, नोटीस कालावधीच्या समाप्तीनंतर बँक लॉकर Breaking-open ची कारवाई चालू करेल.
    - बँक,बँक अधिकारी व दोन सन्मानीय पंचांच्या समक्ष संबंधित लॉकरच्या Breaking-open ची कारवाई पूर्ण करेल.सदर कारवाईचे संपूर्ण व्हिडीओ रेकॉर्डिंग केले जाईल.
    - लॉकरच्या Breaking-open च्या कारवाई नंतर बँक, दोन सन्मानीय पंचांच्या समक्ष, लॉकरमधील वस्तूंची यादी तयार करून त्यावर पंचांच्या व बँक अधिकारी यांच्या सहया घेऊन सदरची यादी व लॉकरमधील वस्तू यांचे एक sealed बंडल तयार करून बँकेच्या सेफ मध्ये ठेवले जाईल.
    - वरील सर्व कारवाईचा लेखी अहवाल तयार केला जाईल.
    - वरील सर्व कारवाईसाठी होणारा खर्च लॉकरधारक / वारस यांचेकडून, लॉकरमधील वस्तू परत करतांना वसूल केला जाईल.वस्तू परत करणेसाठी बँक एक वर्षापर्यंत लॉकरधारक / कायदेशीर वारस यांची वाट पाहून, जर सदर वस्तूंवर कोणीही हक्क न सांगीतलेस, कायदेशीर प्रकीयेचा अवलंब करून सदरच्या वस्तूंची विल्हेवाट लावणेचा बँकेला अधिकार राहील.

Scanned with OKEN Scanner

➢ न्यायालय किंवा कायदयाने अधिकार प्रदान केलेल्या पदसिध्द् सक्षम अधिका-याच्या ( Competant Authorities ) आदेशाने बँक अधिकारी, संबंधित न्यायालयाने / अधिका-याने नेमणूक केलेला अधिकारी व दोन सक्षम पंचांच्या समक्ष लॉकर Breake open केला जाईल. सदर कारवाईचे संपूर्ण व्हिडीओ रेकॉर्डिंग केले जाईल व याबाबत केलेल्या कारवाईचा सविस्तर लेखी अहवाल तयार केला जाईल.

<u>नामांकन सुविधेबाबतचे धोरण ः</u>

➢ लॉकरसाठी नामांकन सुविधेचा लाभ घेणे अगर न घेणे याचा निर्णय लॉकर धारकाने घेणेचा आहे. तथापी लॉकर धारकास नामांकन करणेचे नसलेस तशी स्पष्ट सूचना लॉकर धारकाने लेखी स्वरूपात बँकेला देणेची आहे. तथापी लॉकर भाडयाने घेतलेल्या कालावधीत ग्राहक कोणत्याही वेळी बँकेस लेखी सूचना देऊन लॉकरवर नामांकन करू शकेल.

➢ लॉकर भाडयाने घेतेवेळी लॉकर धारक नामनिर्देशन करू शकेल. नामनिर्देशन करणेसाठी विहीत नमुन्यातील अर्ज ग्राहकाने बँकेकडे सादर केला पाहिजे. तसेच लॉकर घेतेवेळी केलेले नामांकन कोणत्याही वेळी बँकेकडे लेखी अर्ज देऊन रद्द करता येईल व लॉकर धारकाच्या मर्जीनुसार नव्याने नामांकन करता येईल. यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही.

➢ नामनिर्देशित व्यक्तीचे दोन पासपोर्ट साईजचे फोटो ग्राहकानेAttest करून बँकेला दिला पाहिजे.

➢ नामनिर्देशन केल्याबाबतची पोहोच ग्राहकाने बँकेकडून घेणेची आहे.

➢ लॉकरधारकाचे मृत्युपश्चात नामांकनाबाबत कायदेशीर वाद निर्माण झालेस व मयत लॉकरधारकाच्या अन्य कायदेशीर वारसांनी बँकेकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवलेस असा वाद मयत लॉकर धारकाच्या वारसांनी न्यायालयात सोडवणेचा आहे. अशा वेळी बँक न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कामकाज करेल.

➢ लॉकर धारक मयत झालेस लॉकरमधील चीज वस्तू काढणे व लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणे यासाठीच नामनिर्देशित व्यक्तीला मयत लॉकर धारकाचा लॉकर Opret करू देणे इतकीच बँकेची जबाबदारी राहील. अन्य कोणत्याही बाबीशी बँकेचा संबंध राहणार नाही.

<u>मयत लॉकर धारकाचे बाबतीतील धोरण ः</u>

➢ लॉकर धारक मयत झालेस लॉकर धारकाच्या वारसांनी बँकेला लेखी सूचना दिली पाहिजे. अशी सूचना प्राप्त झालेनंतर ः

- <u>वैयक्तिक लॉकर धारकाच्या बाबतीत,</u>
  - ✓ मयत लॉकर धारकाने जर नामांकन केले असेल तर, बँक नामनिर्देशित व्यक्तीला, त्याची ओळख पटल्यानंतर, मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून घेणेसाठीच केवळ लॉकर Operate करणेस परवानगी देईल. नामनिर्देशित व्यक्तीने मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून घेऊन लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणेचा आहे. नामनिर्देशित व्यक्तीला मयत लॉकर धारकाच्या नांवाने लॉकर चालू ठेवता येणार नाही.
  - ✓ मयत लॉकर धारकाने जर नामनिर्देशन केले नसेल तर मयत लॉकर धारकाच्या सर्व कायदेशीर वारसांनी बँकेकडे रितसर अर्ज करून सर्वांच्या वतीने एका व्यक्तीची वारस म्हणून नोंद करून घेणेची आहे. अशा सर्व संमत वारसाला मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून

Scanned with OKEN Scanner

THE VITA MERCHANTS' CO-OP. BANK LTD. VITA (SANGLI)

घेणेसाठीच केवळ लॉकर Operate करणेस परवानगी देईल. नेमस्त वारस व्यक्तीने मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून घेऊन लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणेचा आहे. नेमस्त वारस व्यक्तीला मयत लॉकर धारकाच्या नांवाने लॉकर चालू ठेवता येणार नाही.

✓ मयत लॉकर धारकाने जर नामनिर्देशन केले नसेल व मयत लॉकर धारकाच्या वारसाबाबत वाद असतील तर वारसनोंद सक्षम कोर्टाच्या आदेशाने केली जाईल. बँक अशा प्रकारे न्यायालयाच्या आदेशाने वारस व्यक्तीला मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून घेणेसाठीच केवळ लॉकर Operate करणेस परवानगी देईल. वारस व्यक्तीने मयत लॉकर धारकाच्या लॉकरमधील चीज वस्तू काढून घेऊन लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणेचा आहे. वारस व्यक्तीला मयत लॉकर धारकाच्या नांवाने लॉकर चालू ठेवता येणार नाही.

- संयुक्त लॉकर धारकांच्या बाबतीत
  - ✓ जर लॉकर संयुक्त सहीने Operate करणेचा असेल व लॉकर धारकांनी एखादया व्यक्तीचे नांवे नामांकन केले असेल तर बँक, हयात असणारे लॉकर धारक व नामनिर्देशित व्यक्ती यांना, त्यांच्या संयुक्त सहीने, लॉकर मधील चीज वस्तू काढून घेऊन लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणेसाठी Operate करणेस परवानगी देईल. त्यानंतर सदरचा लॉकर करार संपुष्टात येईल.
  - ✓ जर लॉकर "either or survivor", or "anyone or survivor" या पध्दतीने Operate करणेचा असेल तर बँक हयात असणा-या लॉकर धारकांना, लॉकर मधील चीज वस्तू काढून घेऊन लॉकर रिकामा करून बँकेच्या ताब्यात देणेसाठी Operate करणेस परवानगी देईल. त्यानंतर सदरचा लॉकर करार संपुष्टात येईल.

➢ मयत लॉकर धारकाच्या Settlement ची प्रक्रिया, बँकेने वारसनोंदीबाबतचा अर्ज प्राप्त झालेनंतर,15 दिवसांत पूर्ण करणेची आहे.

गोपनियतेबाबतचे धोरण :

➢ बँक आपल्या ग्राहकांना दिलेल्या लॉकर्सबद्दल गोपनियता बाळगेल. लॉकर्स बद्दल लॉकर भाडयाने घेणा-या व्यक्तीबद्दल व लॉकरच्या परिचलनाबाबत बँक कोणतीही माहिती अधिकृत व्यक्तीशिवाय अन्य कोणालाही देणार नाही.

➢ तथापी ग्राहकाने लेखी सूचना दिल्यास, ग्राहकाने निर्देशित केलेल्या व्यक्तीला सदरची माहिती दिली जाईल. तसेच न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयीन कामकाजासाठी किंवा सक्षम वैधानिक अधिका-याच्या ( Competant Authorities ) आदेशाने अशी माहिती दिली जाई ल. अशा प्रकारे माहिती दिल्यामुळे गोपनियता धोरणाचा भंग झाला आहे असे मानले जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

नुकसान भरपाईबाबतचे धोरण ः

- चोरी, दरोडा व बँकेच्या कर्मचा-यांकडून फसवणूक यासारख्या घटनांपासून लॉकर्सचे संरक्षण करणेसाठी बँक लॉकर्सचा योग्य तो विमा उतरवेल. तथापी अशा घटनांमुळे ग्राहकाचे नुकसान झालेस बँकेच्या नुकसान भरपाई धोरणानुसार पिडीत ग्राहकाला त्याच्या वार्षिक लॉकर भाडयाच्या जास्तीत जास्त 100 पट इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून बँक अदा करेल.
- नैसर्गिक आपत्तीपासून ( Acts of God ) लॉकर्स सुरक्षित ठेवणेचा बँक जास्तीत जास्त प्रयत्न करेल. तथापी नैसर्गिक आपत्तीपासून झालेल्या नुकसानीस बँक जबाबदार राहणार नाही. बँकेच्या नियंत्रणात नसलेल्या घटनांमुळे लॉकर किंवा लॉकरधारकांस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या नुकसान झालेस त्यांस बँक जबाबदार राहणार नाही.
- 18 ऑगस्ट 2021 च्या परिपत्रकानुसार अधीच अमलात आणलेले सुधारीत करार हे सुधारीत आयबीए मॉडेल कराराशी विसंगत असतील अशा प्रकरणामध्ये आरबीआय च्या सदर परीपत्रकातील सर्व तरतुदी, अधीच अमलात आणलेल्या करारामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले नसले तरीही बँकेला लागू राहतील. शिवाय अशा प्रकरणामध्ये बँकेला नविन करारा अमलात आणण्याचा किंवा पुरक करारादवारे ते सुधारीत करण्याचा पर्याय असेल. अश्या बाबींमध्ये स्टॅम्प पेपरचा खर्च बँक अदा करेल.
- बँक या सुचनांचे पालन करत असलेबाबतचा मासिक अहवाल रिझर्व्ह बँकेच्या DAKSHA या पोर्टलवरून रिझर्व्ह बँकेला दरमहा सादर करीत आहे.
- रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार शाखेचा नंबर व बँकेचे नाव असलेला शिक्का लॉकर किल्यावर एम्बॉसिंग करणेचे कामकाज सुरू आहे.
- सदरच्या धोरणांमधील ज्या बाबी रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक तत्त्वाशी विसंगत असतील किंवा संदिग्धता असेल त्या ठिकाणी रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया यांची मार्ग दर्शक तत्त्वे व परिपत्रके ग्राहय धरली जातील.

वरील सर्व विवेचनाच्या व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडील **RBI/2021-2022/86 DOR.LEG.REC/40/09.07.005/2021-22** दिनांक **18/08/2021** व **CO.CEPD.PRS.NO.S1233/13-01-018/2022-20233** दिनांक 23/01/2023 **Direction** नुसार वरील प्रमाणे तयार केलेल्या Safe Deposit Lockers / Safe Custody Articles & Its Standard Operating Procedure विषयीचे धोरणांचा स्वीकार व्हावा ही विनंती.

व्यवस्थापक उप-सरव्यवस्थापक सरव्यवस्थापक मुख्य कार्यकारीअधिकारी

Scanned with OKEN Scanner